कला अकादमी गोवा
पणजी-गोवा
कअ/हिंसंवि/२०२५-२६/१५०४
दि. २४/०९/२५

# कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमीच्या हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभागातर्फे शारदोत्सवानिमित्त, "प्रतिभा" संगीत सभा आयोजित करण्यात आली आहे. दि. ३० सप्टेंबर २०२५ रोजी कला अकादमीच्या कृष्णकक्षात सकाळी ११.३० वाजता सरस्वती पुजन व दुपारी ठिक २.१५ वाजता गायन वादन व नृत्याचा कार्यक्रम होणार आहे. त्यामध्ये सर्वप्रथम सत्यनारायण कळंगुटकर, कु. मुक्ता मिसर, सदानंद झो, राझी फळदेसाई, वंशीका प्रियोळकर हे विद्यार्थी गायनाने कार्यक्रमाची सुरुवात करणार आहे. तद्नंतर कु. रिया चोयीकंदी, यश आपटे व अर्थव गायक यांचे बासरीवादन होणार आहे. बासरीवादनानंतर कु. शुभम आपुले, शिवम तळवणेकर, प्रज्योत गावस, देवानंद नाईक, अशांक माजिक, शिवांक च्यारी, दक्ष ठाकर व आरव परब या विद्यार्थ्यांचे तबला सहवादन होणार आहे. त्यानंतर कु. सोहम कुर्ट्टीकर, विवेक गावस, आकाशी गांवकर व यतिश तळणकर यांचे सवादिनीवादन होणार आहे. सवादिनीवादनानंतर कु. अनुश्री कोली, तृप्ती दळवी यांचे कर्नाटकी शास्त्रीय गायन होणार आहे व त्यांना तर उमा नाईक, रोहित फळगांवकर व निशा कुडईकर मृदंगमची साथसंगत करणार आहेत. कथ्थक नृत्याच्या कार्यक्रमात उमा नाईक, कु. रिधीमा वेंगुलेकर, कु. गौरक्षा साळसकर, कु. पियु निमकर, साक्षी देशपांडे, तनिशा आमोणकर, तानिया चोपडेकर, वरदा चव्हाण, आरुनी प्रभू ह्या विद्यार्थिनी कथ्थक नृत्य सादर करणार आहे. कथ्थक नृत्यानंतर कु. प्रतिका मराठे, जानवी म्हांबरे, अनुश्री कोली, मुस्कान खानोलकर, कु. तृप्तीदळवी, अमीषा अडकोणकर, चैत्राली काला नागा, श्रृती खोर्जुवेकर, शिल्पा के, मंजिरी फुटणकर, निधी नाईक शिरोडकर, इच्छा नाईक, नेहाली किनळकर, आभा नाडकर्णी, श्रव्या शेट, आरोही सुभेदार, गिना पाडगांवकर, इशीता शेटकर, वरालीका पिसुलेकर, शताक्षी फळगांवकर ह्या विद्यार्थिनी भरतनाटयम्‌चे सादरीकरण करणार आहेत व शेवटी कार्यक्रमाची सांगता सतारचे व्याख्याते श्री. सदानंद आमोणकर यांच्या सतारवादनाने होणार आहे.

गायन-वादन नृत्याच्या कार्यक्रमासाठी सर्व कलाकारांना शैलेश गांवकर, सूरज मोरजकर, भार्गवराम गर्दे, श्रीपाद च्यारी, प्रज्योत ताम्हणकर यांची तबला साथसंगत तर शुभम नाईक यांची संवादिनी साथसंगत लाभणार आहे. भरतनाटयम नृत्यासाठी डॉ. सपना नाईक व सौ. मंदिरा तिरोडकर या नटवंगमची साथ करणार असून विद्‌वान श्री. डि. आर. चेथनमुर्ती हे मृदंगमची साथसंगत करतील व डॉ. दिप्ता रुबसुंदरम्‌ यांची गायन साथसंगत विद्यार्थ्यांना लाभणार आहे.

सदर कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून सर्व संगीत रसिकांनी या कार्यक्रमास उपस्थित रहावे असे हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभागातर्फे कळविण्यास येत आहे.

हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभाग
कला अकादमी गोवा

प्रति

१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड

७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)